महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना विद्युतपंप वाटप योजनेचा मूल्यमापन अहवाल

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

२००५-२००६

# अ नु क्र म णि का


| अ.क्र. | तपशील | | पृष्ठे पासून | पृष्ठे पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | | १ | - |
| २. | प्रकरण क्रमांक १ | विशेष केंद्रीय सहाय्य योजनेबाबतची माहिती | २ | ८ |
| ३ | प्रकरण क्रमांक २ | मूल्यमापनाचे उद्देश | ९ | - |
| ४. | प्रकरण क्रमांक ३ | कार्यपध्दती | १० | ११ |
| ५. | प्रकरण क्रमांक ४ | आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंपाचा पुरवठा करणे | १२ | १९ |
| ६. | प्रकरण क्रमांक ५ | क्षेत्रीय पाहणी | २० | ३९ |
| ७. | प्रकरण क्रमांक ६ | सारांश | ४० | ४१ |
| ८. | प्रकरण क्रमांक ७ | योजना राबविण्यामधील अडचणी/उपाययोजना | ४२ | ४३ |
| | | परिशिष्ट-१ | ४४ | ५१ |
| | | परिशिष्ट-२ | ५२ | - |
| | | परिशिष्ट-३ | ५३ | - |
| | | लाभार्थी प्रपत्र | ५४ | ५७ |

## प्रस्तावना

आदिवासी जमातीचे कास्तकार हे शेतीवर व शेतमजुरीवर जीवन जगत असतात. शेती असलेल्या कास्तकारांना सिंचनाची सोय उपलब्ध करुनदेणे, पाण्याचा उपसा करण्यासाठी विजपंप उपलब्ध करुन देणे या योजना राज्य शासनाकडून राबविण्यात येतात. तसेच केंद्र शासनाकडून "विशेष केंद्रीय सहाय्य योजनेतर्गत" वैयक्तीक लाभाच्या अनेक योजना अतिरिक्त निधी देऊन राबविण्यात येतात. केंद्र व राज्य या दोन्ही योजनेतून "विजपंप पुरवठा" ही योजना राबविण्यात येते. या योजनेचा आदिवासी कास्तकारांना किती प्रमाणात उपयोग झाला आहे हे पाहण्याकरीता या योजनेची मूल्यमापनकरिता निवड करुन पहाणी करण्यात आलेली आहे.

सदर मूल्यमापन अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील श्री.के.एस.चव्हाण, सांख्यिकी अधिकारी, श्री.पी.बी.कुदळे, संशोधन सहाय्यक यांनी श्री.एस.डी.बिराजदार, उपसंचालक (एक्षेविका) यांचे मार्गदर्शनाखाली केले असून श्री.आर.एस.पवार, अन्वेषक यांनी या कामी सहाय्य केले आहे.

हा मूल्यमापन पाहणी अहवाल, ही योजना राबविणारी प्रकल्प कार्यालये, या योजनेची आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी, आदिवासी विकास विभागातील कर्मचारी, आयुक्त, आदिवासी विकास व इतर संबंधितांना उपयोगी पडेल.

दिनांक : ८.६.२००६
ठिकाण : पुणे

(वाय.पी.एस.तोमर)
आयुक्त,
आदिवासी संशोधन व पशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

## प्रकरण १

## विशेष केंद्रीय सहाय्य योजनेबाबत माहिती

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने आदिवासी जमातीच्या विकासाकरिता राज्य शासनाकडून विविध योजना राबविण्यात येतात. या योजनेस "अतिरिक्त निधी" विशेष केंद्रीय सहाय्य योजनेतर्गत केंद्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून राज्य शासनास पुरविण्यात येतो. या विशेष केंद्रीय सहाय्य योजनेतून प्रामुख्याने आदिवासींच्या वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात येतात. या योजना कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, रेशीम उद्योग, सहकार या क्षेत्रातील घेण्यात येतात. "विशेष केंद्रीय सहाय्य" योजनेच्या एकूण तरतुदीच्या ३०% पर्यंत तरतूद वैयक्तीक लाभाच्या योजनेस उपयुक्त अशा "मूलभूत सेवा" सुविधांच्या योजनेवर खर्च करता येते.

राज्य शासनाकडून आदिवासींसाठी ज्या योजना राबविल्या जातात, त्याचाच एक पूरक भाग म्हणून "विशेष केंद्रीय सहाय्य" ही योजना राबविली जाते. या योजनेचे खालीलप्रमाणे दोन उद्देश आहेत.

(१) आदिवासी जमातीचा आर्थिक व सामाजिक विकास करणे.

(२) आदिवासी जमातीवर होणाऱ्या अन्याय व पिळवणुकीपासून आदिवासी लोकांचा बचाव करणे.

विशेष केंद्रीय सहाय्य योजनेद्वारे आदिवासीच्या आर्थिक विकासासाठी केंद्र शासनाची असलेली मूलतत्वे :-

(१) "विशेष केंद्रीय सहाय्य" योजना ही प्रामुख्याने वैयक्तीक उत्पन्न वाढवणारी व केंद्रीय सहाय्य योजना तरतुदीच्या ३०% पर्यंत मूलभूत सुविधा योजनेवर खर्च करता येणारी योजना आहे.

(२) केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत एखाद्या योजनेसाठी तरतूद ठेवण्यात आली असेल तर त्या योजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य योजनेची तरतूद खर्च करता येणार नाही, जोपर्यंत त्या योजनेकरीता विशेषत्वाने तरतूद उपलब्ध होत नाही.

(३) आदिवासी उपयोजनेअंतर्गत असलेल्या योजनेमध्ये, विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत असलेल्या रस्ते, विद्युत यासाठी करावयाच्या खर्चाच्या तरतूदीशिवाय, "मूलभूत सेवा" सुविधांच्या बाबींसाठी तरतूद पुरविण्यात येते.

(४) विशेष केंद्रीय सहाय्य योजनेतून प्रात्यक्षीक युनीटकरीता खर्च करता येत नाही. प्रात्याक्षीकासाठी खर्च करण्यात येत असेल तर तो आदिवासीसाठी असलेल्या तरतुदीचा दुरुपयोग आहे.

(५) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना उपयुक्त असतील अशाच योजनांना विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत तरतूद पुरविण्यात येते.

(६) कोणत्याही एखाद्या योजनेस/ प्रकल्पास राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्राधिकरणाकडून तरतूद पुरविण्यात येत असल्यास यातील राज्य शासनाच्या तरतूदीचा हिस्सा राज्याच्या तरतूदीतूनच करण्यात येतो. विशेष केंद्रीय सहाय्य योजनेतून अशा प्रकारची तरतूद करता येत नाही.

(७) आदिवासी कल्याणाशी संबंधित असलेल्या राज्य शासनाचे आदिवासी विकास महामंडळ, वन विकास महामंडळ यांच्या आदिवासी विकास योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधीत असलेल्या योग्य समान हिश्याची तरतूद विशेष केंद्रिय सहाय्य योजनेच्या तरतूदीमधून केंद्र शासनाच्या परवानगीशिवाय देता येत नाही. त्यामुळे अंमलबजावणीवर चांगले नियंत्रण ठेवता येते.

(८) आदिवासी विकासास उत्तेजन देणाऱ्या विशेष योजना जसे रेशिम उद्योग, फलोत्पादन इत्यादी योजना विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत येतात.

(९) ज्या योजनेमध्ये इतर चालू विकासाच्या योजनांच्या तरतूदींचा संयोग होत असेल तर अशा तरतूदीबाबत खात्री करुन त्या तरतूदी अलग करण्यात येतात.

३. आर्थिक विकासाच्या खालील योजनांकरीता विशेष केंद्रिय सहाय्य योजनेमधून तरतूद करण्यात येते.

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे क्षेत्र हे सलग असलेल्या क्षेत्रातील एकूण लोकसंख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेले क्षेत्र असावे.

(२) एकूण १०,००० लोकसंख्या असलेल्या सलग क्षेत्रात ५०% किंवा त्यापेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या क्षेत्रास माडा क्षेत्र म्हणून ओळखले जाते.

(३) एकूण ५,००० लोकसंख्या असलेल्या सलग क्षेत्रातील आदिवासी गावांच्या समूहात आदिवासी लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा जास्त असलेल्या क्षेत्रास मिनी माडा क्षेत्र म्हणून ओळखले जाते.

(४) अगदी कमी साक्षरता असलेले, प्राचीन पध्दतीने शेती करणारे, अति दुर्गम भागात कमी संख्येच्या समूहाने राहणाऱ्या जमातीस आदिम जमात म्हणून ओळखले जाते.

(५) वरील क्रमांक १, २, ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या आदिवासी लोकसंख्येशिवाय असलेले आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी म्हणून ओळखले जाते.

(६) आदिवासी आर्थिक विकास महामंडळास, सिमांतीक आदिवासी विकास कार्यक्रम राबविण्याकरीता सिमांतीक कर्जासाठी अर्थसहाय्य करणे.

(७) आदिवासींच्या आर्थिक विकासाशी संबंधित विशेष प्रकल्पाचे प्रस्ताव स्विकारुन केंद्र शासनाकडून मंजूर केले जातात.

४. कार्यपध्दतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

(१) विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत राज्य शासन / केंद्रशासीत प्रदेशाकडून आदिवासी विकास प्रकल्पाना तरतूद देण्यात येते. तथापी राज्य शासनाच्या कोणत्याही विभागास विशेष केंद्रीय सहाय्य योजनेच्या तरतूदीचा हिस्सा किंवा त्याचा भाग राज्याच्या कोणत्याही विभागास दिला जात नाही. योजनेची तरतूद, योजना अंमलबजावणी करणाऱ्या विभागास वर्ग करावयाची आवश्यकता भासल्यास, संबंधित विभागास तरतूद आदिवासी विभाग प्रकल्पाकडून वितरीत करण्यात येते.

(२) स्थानिक पातळीवरील साधनसामुग्री विचारात घेऊन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाकडून पंचवार्षिक व वार्षिक योजना तयार करण्यात येतात. योजनेतर योजनेच्या बाबीचा समावेश करण्यात येत नाहीत.

(३) विशेष केंद्रिय सहाय्य योजने अंतर्गत प्रस्तावित करावयाच्या योजना सनदशीर पध्दतीप्रमाणे राज्य व केंदशासीत प्रदेशाकडून तयार करावयाच्या आदिवासी विकासाच्या वार्षिक योजनेच्या आराखडयात विशेषत्वाने समाविष्ट करण्यात येतात आणि केंद्र शासनाकडून यास प्रशासकीय मान्यता घेण्यात येते. आर्थिक तरतूदीची मान्यता मात्र प्रकरणनिहाय घेण्याची आवश्यकता नाही.

(४) विशेष केंद्रिय सहाय्य योजनेची तरतूद केंद्र शासनाकडून साधारणपणे राज्याना तीन हप्त्यात वितरीत करण्यात येते. पूर्णतः तरतूद तिसऱ्या तिमाहीमध्ये देण्याचे अपेक्षीत आहे. तरतूद वितरण राज्य शासनाने पूर्वी वितरीत केलेल्या तरतूदीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानुसार वितरीत करण्यात येते.

विशेष केंद्रीय सहाय्य योजनेमधून सन २००१-०२ ते २००५-०६ या ५ वर्षात घेण्यात आलेल्या योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**सन २००१-०२ या वर्षात घेण्यात आलेल्या योजना**

| | |
|---|---|
| १. | शासकीय आश्रमशाळा समूह योजना (टिएसपी) |
| २. | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (टिएसपी) (न्युक्लीअस बजेट योजना) |
| ३. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करणे |
| ४. | आदिवासी विकास महामंडळास वित्तीय सहाय्य (टिएसपी) |

**सन २००२-०३ या वर्षात घेण्यात आलेल्या योजना**

| | |
|---|---|
| १ | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (टिएसपी) (न्युक्लीअस बजेट योजना) |
| २ | जमीनीचा स्तर खोल करणे (विहीर/बोडींचे खोलीकरण करणे) |
| ३ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करणे |
| ४ | आदिवासी विकास महामंडळास वित्तीय सहाय्य (टिएसपी) |
| ५ | शासकीय आश्रमशाळांना संगणक संच पुरवठा करणे. |

## सन २००३-०४ या वर्षात घेण्यात आलेल्या योजना

| | |
|---|---|
| १. | आदिम जमाती व इतर आदिवासी यांचेसाठी घरकुल बांधणे |
| २. | आदि.शेतकऱ्यांना १.५ एचपी. केरोसीन पंप पुरवठा करणे |
| ३. | सामुहिक गटातील शेतकऱ्यांसाठी लघु उपसा सिंचन योजना राबविणे. |
| ४. | जनजागृती मेळावे आयोजित करणे. |
| ५. | वन विभागामार्फत संयुक्त वन व्यवस्थापन योजना राबविणे. |
| ६. | सहकारी संस्थांना विटभट्टी व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे. |
| ७. | महिलांना गांडूळखत तयार करणे यासाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ८. | महिलांना मशरुम (आळींबी) तयार करणे यासाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ९. | महिलांना बायफच्या धर्तीवर फळझाडे नर्सरी तयार करणेसाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| १०. | महिलांना वनऔषधी नर्सरीसाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ११. | महिलांना शिलाई कामाचे प्रशिक्षण देऊन शिलाई यंत्र वाटप करणे. |
| १२. | महिलांना पत्रावळी व द्रोण तयार करणेसाठी यंत्र वाटप करणे |
| १३. | महिलांना व्हेजीटेबल किट वाटप करणे (बी बीयाणे किटकनाशके व इतर साहित्य) |
| १४. | वनगांवातील आदिवासींना पिण्याचे पाण्याची योजना. विहीर, बोअरवेल. |
| १५. | वनगांवातील आदिवासी शेतकऱ्यांना नवीन विहिरी खोदून देणे. |
| १६. | नंदूरबार जिल्हयात आदिवासी क्षेत्रासाठी कोल्हापूर टाईप बंधारे बांधणे |
| १७. | पिग्री गट (वराहपालन) व्यवसाय सुरु करणेसाठी अर्थसहाय्य देणे |
| १८. | चंद्रपूर जिल्हयातील आदिम जमाती पाडयांना पाणी पुरवठा करणे |
| १९. | बांबूपासुन विविध वस्तु तयार करणेस अर्थसहाय्य देणे. |
| २०. | आदिवासींना संगणक प्रशिक्षण देणे |
| २१. | आदिवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळेचे रुपांतर निवासी व्यवसाय प्रशिक्षण शाळेमध्ये करणे |
| २२. | आश्रमशाळेत इ.८वी ते १० वी स्तरावर पुनर्रव्यावसायीक शिक्षण सुरु करणे |
| २३. | व्यवसाय प्रशिक्षणाद्वारे आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करणे |
| २४. | नागपूर प्रकल्पांतर्गत शासनाकडून माहिती अप्राप्त असलेली योजना (योजनेचे नांव नाही) |
| २५. | गडचिरोली जिल्हयातील आदिवासींना १.५ अश्वशक्तीचे केरोसीन पंप पुरवठा करणे. |
| २६. | केंद्रवर्ती अर्थसंकल्प लेखाशिर्ष २२२५-१७१३ |
| २७. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करणे लेखाशिर्ष २२३०-१०६३ |

## सन २००४-०५ या वर्षात घेण्यात आलेल्या योजना

| | |
|---|---|
| १. | आदिम जमाती व इतर आदिवासी यांचेसाठी घरकुल बांधणे |
| २. | आदि.शेतकऱ्यांना १.५ एचपी. केरोसीन पंप पुरवठा करणे |
| ३. | सामुहिक गटातील शेतकऱ्यांसाठी लघु उपसा सिंचन योजना राबविणे. |
| ४. | जनजागृती मेळावे आयोजित करणे. |
| ५. | वन विभागामार्फत संयुक्त वन व्यवस्थापन योजना राबविणे. |
| ६. | आदिवासी सहकारी संस्थांना विटभट्टी व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे. |
| ७. | महिलांना गांडूळखत तयार करणे यासाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ८. | महिलांना मशरुम (आळींबी) तयार करणे यासाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ९. | महिलांना बायफच्या धर्तीवर फळझाडे नर्सरी तयार करणेसाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| १०. | महिलांना वनऔषधी नर्सरीसाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ११. | महिलांना शिलाई कामाचे प्रशिक्षण देऊन शिलाई यंत्र वाटप करणे. |
| १२. | महिलांना पत्रावळी व द्रोण तयार करणेसाठी यंत्र वाटप करणे |
| १३. | महिलांना व्हेजीटेबल किट वाटप करणे (बी बीयाणे किटकनाशके व इतर साहित्य) |
| १४. | वनगावातील आदिवासींना पिण्याचे पाण्याची योजना. विहीर बोअरवेल. |
| १५. | वनगावातील आदिवासी शेतकऱ्यांना नवीन विहिरी खोदून देणे. |
| १६. | नंदूरबार जिल्हयात आदिवासी क्षेत्रासाठी कोल्हापूर टाईप बंधारे बांधणे |
| १७. | पिग्री गट (वराहपालन) व्यवसाय सुरु करणेसाठी अर्थसहाय्य देणे |
| १८. | चंद्रपूर जिल्हयातील आदिम जमाती पाडयांना पाणी पुरवठा करणे |
| १९. | आदिवासींना बांबुपासुन विविध वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| २०. | आदिवासींना संगणक प्रशिक्षण देणे |
| २१. | आदिवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळेचे रुपांतर निवासी व्यवसाय प्रशिक्षण शाळेमध्ये करणे |
| २२. | आश्रमशाळेत इ.८वी ते १० वी स्तरावर पुनर्रव्यावसायीक शिक्षण सुरु करणे |
| २३. | व्यवसाय प्रशिक्षणाद्वारे आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करणे |
| २४. | नागपूर प्रकल्पांतर्गत शासनाकडून माहिती अप्राप्त असलेली योजना (योजनेचे नांव नाही) |
| २५. | आदिम जमाती व इतर आदिवासी यांचेसाठी घरकुल बांधणे |
| २६. | सामुहिक गटातील शेतकऱ्यांसाठी लघु उपसा सिंचन योजना राबविणे |
| २७. | आदिवासी सहकारी संस्थांना विटभट्टी व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे |
| २८. | वन विभागामार्फत संयुक्त वन व्यवस्थापन योजना राबविणे |

| | |
|---|---|
| २९. | बांबुचे उत्पादन करणे व वस्तु तयार करणेसाठी अर्थसहाय्य देणे. |
| ३०. | मका प्रक्रिया केंद्र स्थापन करणे. |
| ३१. | आमचुर गोळा करुन त्यावर प्रक्रिया करणे |
| ३२. | दालीया तयार करणेसाठी अर्थसहाय्य देणे |
| ३३. | गालीचा विनकाम करणेसाठी अर्थसहाय्य देणे |
| ३४. | दुग्ध उत्पादन / व्यवसाय करणेस अर्थसहाय्य देणे |
| ३५. | ड्रमस्टीक प्लँटेशन करणेसाठी अर्थसहाय्य देणे |
| ३६. | नवीन घरकुलांचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना रुफ टॉप रेन वाटर हार्वेस्टींगचा लाभ देणे |
| ३७. | आदिम जमातींच्या लाभार्थ्यांस वनसंरक्षक भरतीपूर्व प्रशिक्षण देणे |
| ३८. | आदि.शेतकऱ्यांना नवीन विहिरी खोदून देणे |
| ३९. | आदि.शेतकऱ्यांना बैलगाडी वाटप करणे |
| ४०. | आदिवासी मत्स्यमारांना मत्सव्यवसायास अर्थसहाय्य देणे |
| ४१. | आदिवासींना वराहपालन (पिग्री गट) पुरवठा करणे |
| ४२. | मधमाशी पालन करणेसाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ४३. | आदिवासी महिलांना वनऔषधी नर्सरी तयार करणेसाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ४४. | आदिवासी महिलांना चिली व तुरचे उत्पादन करणेसाठी प्रशिक्षण देऊन अर्थसहाय्य देणे. |
| ४५. | आदिवासी महिलांना झाडू तयार करणेसाठी अर्थसहाय्य देणे. |
| ४६ | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (ले.शि-२२२५-१७१३) |
| ४७ | शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करणे, ले.शि-२२३०-१०६३ |

वरील योजनांची योजनानिहाय तरतूद, खर्च, भौतिक उदिष्टय व साध्याची माहिती परिशिष्ट-१ मध्ये दिलेली आहे. तसेच वर्ष १९९०-९१ ते २००५-०६ तरतूद व खर्चाच्या माहितीबाबतचा तक्ता परिशिष्ट-२ मध्ये दिलेला आहे.

## प्रकरण २

## मूल्यमापनाचे उद्देश

आदिवासी शेतकऱ्यांना "विद्युत पंप पुरवठा" या योजनेंतर्गत पुरविण्यात आलेला विजपंप प्रत्यक्षात उपलब्ध झाला का ? कार्यान्वीत आहे का ? योजना राबविण्यातील अडचणी काय आहेत ? हे पाहण्यासाठी विजपंप वाटप या योजनेची मूल्यमापन पाहणी करण्यासाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आले आहेत.

१) शासनाने निश्चित केलेले, या योजनेचे उद्देश साध्य झाले का ?

२) ही योजना राबविण्यामध्ये काय अडचणी आहेत ?

३) योजनेमध्ये काय सुधारणा करणे आवश्यक आहे ?

# प्रकरण ३

## कार्यपध्दती

"विद्युत पंप वाटप" या योजनेचे मूल्यमापन पाहणी करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये कुटुंबाची वैयक्तीक माहिती कुटुंबाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय, कुटुंबाने धारण केलेले जमिनीचे क्षेत्र, पशुधन, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न, त्याचबरोबर कुटुंब प्रमुखाचे वय, शिक्षण इत्यादी माहिती गोळा करण्यात आली आहे.

आदिवासी शेतकऱ्यांना १००% अनुदानावर विजपंप वाटप ही योजना संपुर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येत असल्यामुळे या योजनेचे लाभार्थी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये आहेत. या सर्व जिल्हयामध्ये मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रीय काम करणे शक्य होणार नाही. म्हणून क्षेत्रीय पाहणीसाठी प्रातिनिधीक स्वरुपात सात जिल्हे की ज्या जिल्हयामध्ये आदिवासींची लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे असे जिल्हे निवडण्यात आले व क्षेत्रीय पाहणीचे काम करण्यासाठी या कार्यालयातील पाच अधिकाऱ्यांची पाच पथके तयार करण्यात आली. प्रत्येक पथकामध्ये एक अधिकारी, एक संशोधन सहाय्यक व एक सांख्यिकी सहाय्यक/अन्वेषक/वरिष्ठ लिपिक यांचा समावेश होता. प्रत्येक पथकास एक जिल्हा मूल्यमापन पाहणीसाठी देण्यात आला होता. "विद्युत पंप वाटप" योजनेची माहिती संबंधित कार्यालय प्रमुखांशी चर्चा करुन घेण्यात आलेली आहे.

मूल्यमापन पाहणी अहवाल लिहिण्यासाठी लागणारी दुय्यम माहिती, आयुक्त, आदिवासी विकास नाशिक या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यात आली आहे.

प्रत्येक पथकास वाटून देण्यात आलेले जिल्हे व त्या पथकाने या विषयाची भरलेली पत्रके याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पथक प्रमुखाचे नांव | जिल्हयाचे नांव | प्रकल्प कार्यालय | तालुका | गावांची संख्या | लाभार्थी पत्रके संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.आर.बी. मानकर | नाशिक | नाशिक | दिंडोरी | १ | ३ |
| | | | कळवण | कळवण | ४ | १० |
| २. | श्रीमती एस.ए.मुंढे | अमरावती | धारणी | धारणी | ८ | १३ |
| ३. | श्री.एम.ए.शेख | यवतमाळ | पांढरकवडा | झरी | २ | ४ |
| | | | | केळापूर | १ | १ |
| | | | | घाटंजी | १ | १ |
| | | नांदेड | किनवट | किनवट | ६ | ७ |
| ४. | श्री.व्ही.बी.कांबळे | चंद्रपूर | चंद्रपूर | राजुरा | २ | ४ |
| | | गडचिरोली | गडचिरोली | आरमोरी | ४ | ५ |
| | | | | गडचिरोली | ३ | ३ |
| | | | | धानोरा | ३ | ३ |
| ५. | श्री.के.एस.चव्हाण | नंदुरबार | तळोदा | धडगाव | ४ | १० |
| | **एकूण** | - | - | - | **३९** | **६४** |

या मूल्यमापन पाहणीसाठी ७ जिल्हयातील ८ प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या १२ तालुक्यातील ३९ गावामधील ६४ लाभाधारकांची पत्रके भरुन घेण्यात आली आहेत.

* * *

## प्रकरण क्र.४

## आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंपाचा पुरवठा करणे

आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या जमिनीत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे, विजपंप पुरवठा करणे इत्यादी सोयी पुरवून आदिवासी शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्यात येत आहे. आदिवासी शेतकऱ्यांना विजपंप पुरवठा करण्यासाठी १००% अनुदान देण्यात येते. लाभधारकाचा हिस्सा म्हणून नाममात्र रक्कम रु.२५०/- रु.५००/- घेण्यात येते. आदिवासी शेतकऱ्यांना विद्युतपंप पुरवठा करण्यासाठी असेलेले नियम व अटी खालीलप्रमाणे आहेत.

**विद्युत पंप पुरवठयाचे नियम व अटी :**

१. आदिवासी शेतकऱ्याकडे किमान ६० आर (दिड एकर) आणि कमाल ६ हेक्टर ४० आर. (१६ एकर) इतकी लागवडी योग्य जमिन असली पाहिजे.

२. आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप मंजूर करताना त्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहीरीस/नाल्यास कमीत कमी सहा महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

३. आदिवासी शेतकऱ्याच्या विहीरीस किंवा पाण्याचे स्त्रोत असलेल्या नदी नाल्यास पुरेशे पाणी उपलब्ध आहे याबाबत खालील यंत्रणांची परवानगी दाखला घेणे आवश्यक आहे.

(अ) नाल्याचे पाणी घ्यावयाचे असल्यास तहसिलदाराची परवानगी लागते.

(ब) अधिसूचित नाला असल्यास पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची परवानगी लागते.

(क) लाभार्थ्यांच्या विहीरीस किंवा पाण्याचे स्त्रोत असलेल्या नदी व वर नमुद केलेल्या उद्भवामध्ये पाण्याची उपलब्धता पूरेशी आहे याविषयी आदिवासी विकास निरिक्षकांनी प्रत्यक्ष पाहणी करुन दाखला द्यावा लागतो.

४. आदिवासी शेतकरी स्वत: जमिन कसत असला पाहिजे व तसेच त्याने आपल्या अर्जात प्रतिज्ञेवर नमूद करावे लागते. ज्या आदिवासी शेतकऱ्यांची जमिन इतरांकडे कसायला देण्यात आली आहे अशा आदिवासी लाभार्थीला या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

५. ६० आर पेक्षा कमी जमिन ज्यांच्या नावाने असेल अशा किंवा लगतच्या तीन जमिनधारकांनी एकत्रित येऊन करार लिहून दिला तर एकापेक्षा अधिक लाभधारक एकत्रितपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील. मात्र अशा एकत्र आलेल्या शेतकऱ्यांची एकूण जमिन ६० आरपेक्षा जास्त असली पाहिजे.

६. या योजनेखाली ज्या गावात/शेतात विद्युत पुरवठा केला जाऊ शकतो त्या गावाच्या शेतकऱ्यासच फक्त विजपंप पुरवला जातो व जेथे विजपुरवठा केला जात नाही अथवा नजिकच्या भविष्यकाळात ३ वर्षे विद्युत पुरवठा केला जाण्याची शक्यता नाही अशा ठिकाणी तेलपंप पुरविण्यात येतो.

७. लाभार्थीस विजपंप दुसऱ्याला हस्तांतर करता येत नाही किंवा भाडयाने देता येत नाही.

**लाभार्थीचा सहभाग :**

१. या योजनेचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक आदिवासी शेतकऱ्यांनी त्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या पंपाच्या किंमतीत आर्थिक सहभाग देणे आवश्यक आहे. आर्थिक सहभागाची रक्कम आदिवासी शेतकऱ्यांना पंप मंजूर झाल्यानंतर संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे भरणा करावी लागते. प्रत्येक पंपामागे ६० आर ते ४ हेक्टर जमिनधारक आदिवासी शेतकऱ्यांना रु.२५०/- आणि चार (४) हेक्टरपेक्षा जास्त जमिन असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना रु.५००/- लाभार्थींचा आर्थिक सहभाग म्हणून भरावा लागतो.

२. जेव्हा एकापेक्षा अधिक आदिवासी शेतकरी एकत्रित येऊन या योजनेचा लाभ घेऊ इच्छित असतील तर अशा लाभधारकांना त्यांची एकत्रित आर्थिक सहभागाची रक्कम सम प्रमाणात भरावी लागते.

**लाभार्थ्यांची निवड :**

१. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांनी संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

२. प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्याच्या कार्यालयात प्राप्त झालेला अर्ज परिपूर्ण असल्याची खात्री करुन अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची छाननी करुन परिपूर्ण अर्जदाराच्या संदर्भात (१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, (२) भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, (३) नदी नाल्यावरुन पाणी उचलण्यासाठी लाभार्थींनी अर्ज केला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे परवानगी पत्र प्राप्त करुन घ्यावे लागते.

३. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर व आवश्यक असल्यास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे लाभार्थीची चौकशी पडताळणी करुन प्रकरण कार्यबल समिती समोर मंजूरीसाठी सादर करतात व कार्यबल समितीने मंजूर केलेली प्रकरणे प्रकल्प अधिकारी, विहित मुदतीत

संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांचेकडे पाठवितात व त्यानंतर प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ हे पंप बसविण्याची कार्यवाही करतात.

**विजपंपाना विज जोडणी देणे :**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून लाभार्थ्यांची विजपंपाची मंजूरी यादी प्राप्त होताच प्रादेशिक व्यवस्थापक आदिवासी विकास महामंडळ यांनी संबंधित विज मंडळाच्या कार्यालयातून फर्म कोटेशन घेऊन तात्काळ भरणा करावा लागतो. पंप बसविला जात असतानाच किंबहूना त्या अगोदरच विज मंडळाने खांब उभारणे व तारा उभारणे, तारा ओढणे इत्यादी प्राथमिक बाबी पुर्ण केल्या जातात. पंप बसविल्यानंतर लगेचच चाचणी अहवाल विज मंडळास देणे शेतकऱ्याच्या वतीने विज मंडळास करारनामा व इतर पुर्तता करुन देणे इत्यादी बाबी प्रादेशिक व्यवस्थापक व विज मंडळाचे संबंधित अधिकारी यांनी संयुक्तरित्या समन्वय साधून विजपंप कार्यान्वित करावा अशा शासनाच्या सूचना आहेत.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात हि योजना सन १९७३-७४ पासून सुरु केली आहे. सन १९७३-७४ ते १९८०-८१ पर्यंत ६२३४ विद्युतपंप मंजूर केले होते. त्यापैकी ६२३२ चे फिटींग करुन ६१७१ वीजपंप कार्यान्वीत केले होते. तर ६१ वीजपंप अकार्यान्वीत होते. सन १९८१-८२ ते २००२-२००३ या कालावधीत मंजूर, फिटींग केलेले, कार्यान्वीत आणि अकार्यान्वीत विज पंपांची वर्षनिहाय माहिती परिशिष्ट-३ मध्ये दिलेली आहे.

## सन १९७३-७४ पासून सन २००२-२००३ पर्यंत मंजूर, फिटींग केलेले व कार्यान्वीत केलेले विद्युतपंप याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रकल्प कार्यालय | मंजूर विजपंप | फिटींग केलेले विजपंप | फिटींग बाकी असलेले विजपंप | फौंडेशन फिटिंगपैकी कार्यान्वित विजपंप | फिटींगपैकी अकार्यान्वित विजपंप | खाते पातळीवर प्रलंबित विजपंप | | | यादी अप्राप्त विजपंप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | महाराष्ट्र राज्य वीज मंडळ | आदिवासी विकास प्रकल्प | आदिवासी विकास महामंडळ | |
| १ | नाशिक | ४४५६ | ४४१९ | २३ | ३०५३ | १३६६ | १३४८ | १८ | ० | १४ |
| २ | कळवण | ६०८५ | ६०३६ | २० | ४५०७ | १५२९ | १५२७ | २ | ० | २९ |
| ३ | नंदूरबार | १०८३३ | १०७६२ | ७१ | ८१९६ | २५६६ | २५४४ | २२ | ० | ० |
| ४ | तळोदा | ४१६९ | ४१६८ | १ | २८६७ | १३०१ | १३०१ | ० | ० | ० |
| ५ | यावल | १७७३ | १७६९ | ४ | १४३२ | ३३७ | ३१३ | २४ | ० | ० |
| ६ | राजूर | २७४७ | २७३८ | ९ | १८८१ | ८५७ | ४०२ | ४५५ | ० | ० |
| | **नाशिक विभाग** | **३००६३** | **२९८९२** | **१२८** | **२१९३६** | **७९५६** | **७४३५** | **५२१** | **०** | **४३** |
| ७ | जव्हार | १२६६ | १२५६ | १० | ८२३ | ४३३ | ३२८ | १०५ | ० | ० |
| ८ | डहाणू | १६१९ | १६१९ | ० | १३१९ | ३०० | २८० | २० | ० | ० |
| ९ | शहापूर | ३०४ | ३०० | ४ | १८६ | ११४ | ९२ | २२ | ० | ० |
| १० | पेण | ३०८ | ३०८ | ० | ८९ | २१९ | १६४ | ५५ | ० | ० |
| ११ | घोडेगांव | १६८६ | १५९२ | ९१ | १०४२ | ५५० | ४५१ | ९९ | ० | ३ |
| | **ठाणे विभाग** | **५१८३** | **५०७५** | **१०५** | **३४५९** | **१६१६** | **१३१५** | **३०१** | **०** | **३** |
| १२ | नागपूर | ३७१४ | ३७०८ | ६ | ३२०४ | ५०४ | ३८७ | ११२ | ५ | ० |
| १३ | देवरी | २४१७ | २४१७ | ० | १७३९ | ६७८ | ५९६ | ६२ | २० | ० |
| १४ | चंद्रपूर | १५५८ | १५५८ | ० | १२५९ | २९९ | २३२ | ४२ | २५ | ० |
| १५ | चिमूर | ९६२ | ९५७ | ५ | ७५७ | २०० | १६८ | २१ | ११ | ० |

| अ. क्र. | प्रकल्प कार्यालय | मंजूर विजपंप | फिटींग केलेले विजपंप | फिटींग बाकी असलेले विजपंप | फौंडेशन फिटिंगपैकी कार्यान्वित विजपंप | फिटींगपैकी अकार्यान्वित विजपंप | खाते पातळीवर प्रलंबित विजपंप | | | यादी अप्राप्त विजपंप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | महाराष्ट्र राज्य वीज मंडळ | आदिवासी विकास प्रकल्प | आदिवासी विकास महामंडळ | |
| १६ | अहेरी | ३१२ | ३१२ | ० | २३५ | ७७ | ५३ | २२ | २ | ० |
| १७ | भामरागड | ५२ | ४५ | ७ | ४१ | ४ | ० | ४ | ० | ० |
| १८ | गडचिरोली | १२८८ | १२८८ | ० | ११४२ | १४६ | १३५ | ११ | ० | ० |
| | **नागपूर विभाग** | **१०३०३** | **१०२८५** | **१८** | **८३७७** | **१९०८** | **१५७१** | **२७४** | **६३** | **०** |
| १९ | पांढरकवडा | ४५७३ | ४४१० | १६३ | २९५५ | १४५५ | १४५५ | ० | ० | ० |
| २० | किनवट-नांदेड | ४४६४ | ४४३० | ३४ | २८२० | १६१० | १६१० | ० | ० | ० |
| २१ | अकोला | ९९६ | ९९० | ६ | ८३४ | १५६ | १५४ | २ | ० | ० |
| २२ | अकोला/बुलढाणा | ५५५ | ५५४ | १ | ५४० | १४ | १४ | ० | ० | ० |
| २३ | धारणी | ३३९३ | ३३९१ | २ | २१९१ | १२०० | ११८० | २० | ० | ० |
| २४ | औरंगाबाद | १५८२ | १५८२ | ० | १०४८ | ५३४ | ५१० | २३ | १ | ० |
| | **अमरावती विभाग** | **१५५६३** | **१५३५७** | **२०६** | **१०३८८** | **४९६९** | **४९२३** | **४५** | **१** | **०** |
| | **एकूण महाराष्ट्र राज्य** | **६१११२** | **६०६०९** | **४५७** | **४४१६०** | **१६४४९** | **१५२४४** | **११४१** | **६४** | **४६** |
| | **टक्केवारी** | **१००.००** | **९९.१८** | **०.७५** | **७२.८६** | **२७.१४** | **१२.६७** | **६.९४** | **०.३९** | **०.०७** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, मंजूर केलेल्या ६११११२ विद्युत पंपापैकी ६०६०९ विद्युतपंप फिटींग केलेले आहेत. ४५७ विद्युतपंप फिटींग करावयाचे बाकी असून ४६ विद्युत पंपांची यादी आदिवासी विकास महामंडळास अप्राप्त आहे. फिटींग न केलेल्या व यादी अप्राप्त असलेल्या विद्युत पंपांची टक्केवारी ०.८२% इतकी आहे. कार्यान्वीत केलेले विद्युतपंप ४४१६० असून त्यांची मंजूर विजपंपांशी टक्केवारी ७२.८६% असल्याचे दिसून येते.

फिटींग न केलेले विजपंप ४५७ असून हे विजपंप फिटींग न करण्याची कारणे प्रामुख्याने दुबार मंजुरी ३२.६०%, आर्थिक सहभाग भरण्यास असमर्थता २६.०४%, चुकीचा पत्ता ८.५३%, यादी अप्राप्त ८.३२%, विजपंप घेण्यास तयार नसलेले ६.१३%, गावात रहात नसलेले २.४१%, याप्रमाणे असून ४५७ विजपंप फिटींग न झालेल्या पंपाचा कारणनिहाय माहिती खालीलप्रमाणे :-

**सन १९७३-७४ ते २०००-२००१ या २७ वर्षांच्या कालावधीत मंजूर असलेले परंतु दिनांक ३०/६/२००५ अखेरपर्यंत न बसविलेल्या विजपंपांची कारणनिहाय व विभागनिहाय माहिती दर्शविणारा तक्ता**

| तपशिल | ठाणे | नाशिक | अमरावती | नागपूर | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| न बसविलेले विजपंप | १२२ | ११० | २०६ | १९ | ४५७ | - |
| विजपंप घेण्यास तयार नाही | २८ | ० | ० | ० | २८ | ६.१३ |
| दुबार मंजूरी | ५० | ६६ | ३१ | २ | १४९ | ३२.६० |
| मयत | १ | १ | ९ | १ | १२ | २.६१ |
| उत्सुक नाही | ३ | ० | ० | १ | ४ | ०.८८ |
| तेलपंप मागणी | २० | १ | ० | १ | २२ | ४.८१ |
| पत्ता चुकीचा | ७ | १३ | १९ | ० | ३९ | ८.५३ |
| यादी अप्राप्त | ८ | १९ | ४ | ७ | ३८ | ८.३२ |
| जादा हॉर्सपॉवर मागणी | ५ | १ | ० | ० | ६ | १.३१ |
| वाटप बाकी | ० | १ | ० | ० | १ | ०.२२ |
| कारण न दिलेले | ० | ८ | ० | ० | ८ | १.७५ |
| वारस अप्राप्त | ० | ० | १ | ० | १ | ०.२२ |
| पंचायत समितीकडून वाटप | ० | ० | १ | ० | १ | ०.२२ |
| गावात रहात नाही | ० | ० | १० | १ | ११ | २.४१ |
| चुकीचा संच म्हणून परत पुन्हा वाटप नाही | ० | ० | २ | ० | २ | ०.४४ |

| तपशिल | ठाणे | नाशिक | अमरावती | नागपूर | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| आर्थिक सहभाग नसलेले | ० | ० | ११९ | ० | ११९ | २६.०४ |
| वाटप केलेले | ० | ० | ७ | ० | ७ | १.५३ |
| पुरवठा कार्यवाही चालू | ० | ० | १ | ० | १ | ०.२२ |
| प्रकल्प कार्यालयात वीजपंप उपलब्ध नाही | ० | ० | २ | १ | ३ | ०.६६ |
| मुख्य कार्यालया पातळीवर असलेले | ० | ० | ० | १ | १ | ०.२२ |
| पर्यायी नाव मंजूर | ० | ० | ० | ४ | ४ | ०.८८ |

१६४४९ अकार्यान्वीत विजपंपापैकी विद्युत मंडळाकडे प्रलंबीत असलेले विजपंप १५२४४ असून एकूण प्रलंबीत विज पंपांशी टक्केवारी ९२.६७% आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे प्रलंबित असलेल्या विजपंपांची संख्या ११४१ असून एकूण प्रलंबित असलेल्या विजपंपाशी टक्केवारी ६.९४% आहे. आदिवासी विकास महामंडळाकडे प्रलंबीत असलेल्या विजपंपाची संख्या ६४ असून, एकूण प्रलंबीत विजपंपाच्या संख्येशी टक्केवारी ०.३९% आहे. विभागनिहाय व कारणनिहाय १६४४९ प्रलंबीत विज पंपाच्या माहितीचा तक्ता सोबत जोडला आहे.

## सन १९७३-७४ ते २००२-०३ या कालावधीत अकार्यान्वित विद्युत पंपाची, विद्युत मंडळ, प्रकल्प कार्यालय व महामंडळ पातळीवर विविध कारणांनी प्रलंबित पंपाच्या विभागनिहाय माहितीचा गोषवारा

| अ. क्र. | विभाग | अकार्यान्वित विद्युत पंपाची संख्या | विद्युत मंडळाकडे प्रलंबित पंपसंख्या | | | | प्रकल्प कार्यालयाकडे प्रलंबित बीजपंपाची संख्या | | | | | | | | आदिवासी विकास महामंडळाकडे प्रलंबित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व पूर्तता वीज पुरवठा बाकी | डिमांड नोटीस निर्गमित करणे बाकी | ग्रुप मध्ये मंजुरी | एकूण विद्युत मंडळा कडे प्रलंबित | A –1 फॉर्म पूर्तता करणे बाकी | वारस निश्चिती बाकी | लाभार्थी उत्सुक नाही | पंप चोरी व विक्री | विहिर खचल्या मुळे निरुपयोगी | लाभार्थी स्थलांतर | इतर व रद्द | प्रकल्प पातळी वर प्रलंबित | डिमांड नोटीस प्राप्त परंतू भरण बाकी | चाचणी अहवाल पूर्तता बाकी | महामंडळाकडे एकूण प्रलंबित |
| १. | नाशिक | ७९५६ | २५६७ | ४८६४ | ४ | ७४३५ | ४३३ | १७ | १० | ५ | ४ | ० | ५२ | ५२१ | ० | ० | ० |
| २. | ठाणे | १६१६ | ५९४ | ७१९ | २ | १३१५ | ११४ | १२ | ३७ | १ | ० | ० | १३७ | ३०१ | ० | ० | ० |
| ३. | नागपूर | १९०८ | ६७३ | ८०० | ९८ | १५७१ | ७७ | २३ | ५३ | २७ | ३ | १० | ८१ | २७४ | २५ | ३८ | ६३ |
| ४. | अमरावती | ४९६९ | २०३५ | २८८८ | ० | ४९२३ | ८ | १६ | ५ | २ | ० | २ | १२ | ४५ | ० | १ | १ |
| | एकूण | १६४४९ | ५८६९ | ९२७१ | १०४ | १५२४४ | ६३२ | १०५ | ६८ | ३५ | ७ | १२ | २८२ | ११४१ | २५ | ३९ | ६४ |
| | टक्केवारी | - | ३५.६८ | ५६.३६ | ०.६३ | ९२.६७ | ३.८५ | ०.४१ | ०.६४ | ०.२१ | ०.०४ | ०.०७ | १.७२ | ६.९४ | ०.१५ | ०.२४ | ०.३९ |

## प्रकरण क्र.५

## क्षेत्रीय पाहणी

आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंपाचे वाटप या योजनेची मूल्यमापन पाहणी नाशिक, अमरावती, यवतमाळ, नांदेड, नंदूरबार, चंद्रपूर व गडचिरोली या ७ जिल्हयामध्ये घेण्यात आली. त्यामध्ये नाशिक, कळवण, धारणी, पांढरकवडा, किनवट, तळोदा, चंद्रपूर व गडचिरोली या प्रकल्प कार्यालयांअंतर्गत अनुक्रमे दिंडोरी, कळवण, धारणी, झरी, केळापूर, घाटंजी, किनवट, धडगांव, राजूरा, आरमोरी, गडचिरोली व धानोरा या १२ तालुक्यातील एकोणचाळीस गावांचा समावेश आहे.

### (१) मूल्यमापन पाहणी पथके

या मूल्यमापन पाहणीसाठी या कार्यालयातील ५ कार्यासन अधिकाऱ्यांची पाच पथके तयार करण्यात आली होती व प्रत्येक पथकास खालीलप्रमाणे जिल्हे क्षेत्रिय पाहणीसाठी वाटून देण्यात आले होते.

**तक्ता क्र.५.१**

| अ.क्र. | कार्यासन अधिकाऱ्याचे नांव | जिल्हा |
|---|---|---|
| १. | श्री.आर.बी.मानकर (अधिव्याख्याता) | नाशिक |
| २. | श्रीमती एस.ए.मुंढे (संशोधन अधिकारी) | अमरावती |
| ३. | श्री.एम.ए.शेख (अधिव्याख्याता) | यवतमाळ / नांदेड |
| ४. | श्री.व्ही.बी.कांबळे (संशोधन अधिकारी) | चंद्रपूर /गडचिरोली |
| ५. | श्री.के.एस.चव्हाण (सांख्यिकी अधिकारी) | नंदूरबार |

### (२) लाभार्थ्यांचे जमात-निहाय वर्गीकरण

वरील सात जिल्हयातील ३९ गांवामध्ये एकूण ६४ आदिवासी लाथार्थींची पत्रके भरण्यात आली. या ६४ लाभार्थींची जमातीनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.२**

| अ.क्र. | जमातीचे नांव | एकूण लाभार्थी |
|---|---|---|
| १. | कोरकु | १३ |
| २. | गोंड | १९ |
| ३. | अंध | ५ |
| ४. | परधान | ४ |
| ५. | महादेव कोळी | ३ |
| ६. | कोकणी | १० |
| ७. | पावरा | १ |
| ८. | भिल | ९ |
| | एकूण | ६४ |

**तक्ता क्र.५.३**

**एकूण लाभार्थींचे लिंगानुसार (पुरुष व स्त्रिया) वर्गीकरण**

| अ.क्र. | जिल्हा | लाभार्थींची संख्या | लिंग | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रीया | एकूण |
| १. | अमरावती | १३ | १२ | १ | १३ |
| २. | यवतमाळ | ६ | ४ | २ | ६ |
| ३. | नांदेड | ७ | ४ | ३ | ७ |
| ४. | नाशिक | १३ | १२ | १ | १३ |
| ५. | नंदूरबार | १० | १० | ० | १० |
| ६. | चंद्रपूर | ४ | ४ | ० | ४ |
| ७. | गडचिरोली | ११ | १० | १ | ११ |
| | एकूण | ६४ | ५६ | ८ | ६४ |

एकुण ६४ लाभार्थ्यांपैकी ५६(८८%) पुरुष लाभार्थी आहेत. स्त्री लाभार्थ्यांची संख्या ८ (१२%) आहे.

## (३) जिल्हानिहाय बसविलेले व न बसविलेले विद्युतपंप

एकूण सात जिल्हयामध्ये ६४ विद्युतपंप वाटप करण्यात आले. त्याची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.४**

| अ.क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | विद्युपपंप बसविलेले | विद्युत पंप न बसविलेले |
|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | १३ | ११ | २ |
| २. | अमरावती | १३ | ११ | २ |
| ३. | यवतमाळ/नांदेड | १३ | १० | ३ |
| ४. | नंदूरबार | १० | २ | ८ |
| ५. | चंद्रपूर/गडचिरोली | १५ | ६ | ९ |
| | **एकूण** | **६४** | **४०** | **२४** |

वरिल तक्त्यावरुन असे दिसून येते की, एकूण ६४ लाभार्थ्यांना विद्युत पंपाचे वाटप करण्यात आले आहे. त्यातील ४० (६३%) विद्युत पंप लाभार्थ्यांचे विहीर/ नदी/नाल्यावर बसविण्यात आलेले आहेत. तर २४ (३७%) विद्युत पंप पाहणीच्या तारखेपर्यंत बसविलेले नाही असे दिसून आले आहे. २४ विद्युत पंप बसविण्यात आलेले नाहीत. त्यातील २१ लाभार्थीना विद्युत कनेक्शन मिळालेले नाही. एका लाभार्थीने त्याचा विद्युत पंप विकून टाकलेला आहे. एका लाभार्थीस विद्युत पंपासाठी पुरवठा केला आहे. परंतु बियाण्णासाठी पैसे नसल्याने त्याने पेरणी केलेली नाही म्हणून सध्या पंप बसविलेला नाही. तर एका लाभार्थ्यांस मूल्यमापन पाहणीच्या तारखेपर्यंत विद्युत पंप मिळालेला नाही असे दिसून आले आहे.

कार्यान्वीत न झालेल्या २४ विद्युत पंपाची कारणनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.५**

| अ. क्र. | जिल्हा | एकुण लाभार्थी | कारणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विज कनेक्शन अभावी | विज पंप विकुन टाकला | आर्थिक परिस्थितीमुळे | विजपंप मिळाला नाही |
| १ | नाशिक | २ | २ | ० | ० | ० |
| २ | अमरावती | २ | २ | ० | ० | ० |
| ३ | यवतमाळ | २ | १ | ० | ० | १ |
| ४ | नांदेड | १ | ० | १ | ० | ० |
| ५ | नंदूरबार | ८ | ८ | ० | ० | ० |
| ६ | चंद्रपूर | १ | १ | ० | ० | ० |
| ७ | गडचिरोली | ८ | ७ | ० | १ | ० |
| | एकूण | २४ | २१ | १ | १ | १ |

## (४) अर्ज भरण्यास कोणी मदत केली

विद्युत पंप मिळण्यासाठी लाभधारकास अर्ज भरण्यास कोणी मदत केली त्याची माहिती खालीलप्रमाणे :-

**तक्ता क्र.५.६**

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | अर्ज भरण्यास कोणी मदत केली | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नातेवाईक | सामाजिक कार्यकर्ता | स्वतः | ग्रामसेवक | शिक्षक | प्रकल्प कार्यालय | तलाठी | एकुण |
| १. | अमरावती | ४ | ४ | ४ | ० | १ | ० | ० | १३ |
| २. | यवतमाळ | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ६ |
| ३. | नांदेड | ४ | २ | ० | ० | १ | ० | ० | ७ |
| ४. | नाशिक | ३ | ४ | ० | ५ | ० | ० | १ | १३ |
| ५. | नंदूरबार | २ | ८ | ० | ० | ० | ० | ० | १० |
| ६. | चंद्रपूर | २ | ० | २ | ० | ० | ० | ० | ४ |
| ७. | गडचिरोली | ३ | ० | ० | ० | ३ | ५ | ० | ११ |
| | **एकूण** | **२०** | **१९** | **७** | **६** | **६** | **५** | **१** | **६४** |

वरिल तक्त्यावरुन असे दिसून येते की, एकूण ६४ लाभार्थ्यांपैकी २० (३१%) लाभार्थ्यांना नातेवाईक १९ (३०%) लाभार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ता, ७ (११%), लाभार्थ्यांना स्वतः प्रत्येकी ६ (१०%), लाभार्थ्यांना

ग्रामसेवक व शिक्षक, ५ (८%) लाभार्थ्यांना प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी, तर १ (२%) लाभार्थ्यांस तलाठयाने अर्ज भरण्यास मदत केलेली आहे.

### (५) विजपंप कोठे बसविला

कार्यरत असलेले विजपंप कोठे बसविला आहे त्याची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे .

**तक्ता क्र.५.७**

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | विहीर | नदी | ओढा | नाला | तलाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | ८ | १ | २ | ० | ० | ११ |
| २. | यवतमाळ | ४ | ० | ० | ० | ० | ४ |
| ३. | नांदेड | ३ | २ | ० | ० | १ | ६ |
| ४. | नाशिक | ११ | ० | ० | ० | ० | ११ |
| ५. | नंदूरबार | ० | १ | ० | १ | ० | २ |
| ६. | चंद्रपूर | १ | ० | १ | १ | ० | ३ |
| ७. | गडचिरोली | २ | १ | ० | ० | ० | ३ |
| **एकूण** | | **२९** | **५** | **३** | **२** | **१** | **४०** |
| **टक्केवारी** | | **७२** | **१२** | **८** | **५** | **३** | **१००** |

एकूण ६४ लाभार्थीपैकी ४० लाभार्थ्यांचे विजपंपांना विज कनेक्शन मिळाले असून ते पंप कार्यरत आहेत. ४० विजपंपांपैकी २९ (७२%) विजपंप विहीरीवर, ५(१२%) विजपंप नदीवर, ३(८%) विजपंप ओढयावर, २(५%) विजपंप नाल्यावर, तर १ (३%) विजपंप तलावावर बसविलेले आहेत.

### (६) २४ विजपंप कोठे बसविणार आहे

विज कनेक्शन अभावी ६४ विजपंपापैकी २४ (३७%) विजपंप कार्यरत नाहीत. त्यापैकी १९ (७९%) विजपंप विहिरीवर, ३ (१३%) विजपंप नदिवर, प्रत्येकी १(४%) विजपंप ओढा किंवा नाल्यावर बसविण्यात येणार आहेत.

### तक्ता क्र.५.८

| अ. क्र. | जिल्हा | विजपंप कोठे बसविणार आहेत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विहीर | नदी | ओढा | नाला | एकूण |
| १. | अमरावती | २ | ० | ० | ० | २ |
| २. | यवतमाळ | ३ | ० | ० | ० | ३ |
| ३. | नांदेड | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | नाशिक | २ | ० | ० | ० | २ |
| ५. | नंदूरबार | ३ | ३ | १ | १ | ८ |
| ६. | चंद्रपूर | ३ | ० | ० | ० | ३ |
| ७. | गडचिरोली | ६ | ० | ० | ० | ६ |
| **एकूण** | | **१९** | **३** | **१** | **१** | **२४** |
| **टक्केवारी** | | **७९** | **१३** | **४** | **४** | **१००** |

### (७) विजपंप कार्यरत असलेल्या कुटुंबाचे व्यवसायानुसार वर्गीकरण

एकूण ४० विजपंप कार्यरत आहेत. त्यातील ३८ कुटुंबांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे, तर २ कुटुंबांचा नोकरी हा मुख्य व्यवसाय आहे.

१४ कुटुंबाचा दुय्यम व्यवसाय शेतमजूरी, तर २ कुटुंबाचा दुय्यम व्यवसाय धंदा (दुकान) हा आहे तर एक कुटुंब दुग्ध व्यवसाय हा दुय्यम व्यवसाय करते.

### तक्ता क्र.५.९

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | मुख्य व्यवसाय | | दुय्यम व्यवसाय | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेती | नोकरी | शेतमजुरी | धंदा | शेती | दुग्धव्यवसाय |
| १. | अमरावती | ११ | ० | ० | ० | ० | ० |
| २. | यवतमाळ | २ | २ | ० | २ | २ | ० |
| ३. | नांदेड | ६ | ० | १ | ० | ० | १ |
| ४. | नाशिक | ११ | ० | ११ | ० | ० | ० |
| ५. | नंदूरबार | २ | ० | २ | ० | ० | ० |
| ६. | चंद्रपूर | ३ | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | गडचिरोली | ३ | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | | **३८** | **२** | **१४** | **२** | **२** | **१** |

वरील ४० लाभधारकांमध्ये २ लाभधारक नोकरी करीत असलेले आहेत. या लाभधारकांस उत्पन्नाचा स्त्रोत आहे.

विजपंप कार्यरत नसलेल्या २४ कुटुंबाचे मुख्य व दुय्यम व्यवसायाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.१०**

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | मुख्य व्यवसाय शेती | दुय्यम व्यवसाय | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | शेतमजुरी | नोकरी | धंदा | दुग्धव्यवसाय |
| १. | अमरावती | २ | २ | ० | ० | ० |
| २. | यवतमाळ | २ | २ | ० | ० | ० |
| ३. | नांदेड | १ | १ | ० | ० | ० |
| ४. | नाशिक | २ | २ | ० | ० | ० |
| ५. | नंदूरबार | ८ | ८ | ० | ० | ० |
| ६. | चंद्रपूर | १ | ० | ० | ० | ० |
| ७. | गडचिरोली | ८ | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **२४** | **१५** | **०** | **०** | **०** |

विजपंप कार्यरत नसलेल्या २४ कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेती हा असून त्यापैकी १५ (६२%) कुटुंबांचा दुय्यम व्यवसाय शेतमजुरी हा आहे.

**विजपंप लाभधारकांचे पशुधन**

विजपंप कार्यरत असलेले ४० लाभार्थी आहेत. त्यांचे पशुधन खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.११**

| अ. क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | गाई | | म्हैस | | शेळया मेंढया | बैल | कोंबडया | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दुभत्या | भाकड | दुभत्या | भाकड | | | | |
| १. | अमरावती | ११ | ५ | २ | १ | २ | २ | २५ | २५ | ६२ |
| २. | यवतमाळ | ४ | १ | ३ | ० | ० | ० | ६ | ३ | १३ |
| ३. | नांदेड | ६ | २ | ३ | ३ | ० | ० | ५ | २ | १५ |
| ४. | नाशिक | ११ | ५ | १० | ४ | ६ | ९ | २० | २२ | ७६ |
| ५. | नंदूरबार | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | ७ | ११ |
| ६. | चंद्रपूर | ३ | ० | ० | ० | ० | ९ | ४ | ० | १३ |
| ७. | गडचिरोली | ३ | २ | २ | ० | ० | ० | ६ | ३ | १३ |
| | एकूण | ४० | १७ | २० | ८ | ८ | २० | ६८ | ६२ | २०३ |

विजपंप कार्यरत असलेल्या लाभार्थीकडे एकूण २०३ पशुधन आहे. त्यापैकी १७(८%) दुभत्या व २० (१०%) भाकड गाई आहेत. प्रत्येकी ८ (४%) दुभत्या व भाकड म्हशी आहेत. शेळया व मेंढया २० (१०%) तर बैल ६८ (३३%) व बाकीच्या ६२ (३१%) कोंबडया आहेत.

विजपंप कार्यरत नसलेले २४ लाभार्थी आहेत. त्यांच्याकडे एकूण पशुधन खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.१२**

| अ. क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | गाई | | म्हैस | | शेळया मेंढया | बैल | कोंबडया | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दुभत्या | भाकड | दुभत्या | भाकड | | | | |
| १. | अमरावती | २ | १ | ० | ० | ० | ० | २ | ० | ३ |
| २. | यवतमाळ | २ | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ४ |
| ३. | नांदेड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | नाशिक | २ | ० | ० | ० | १ | ० | २ | ० | ३ |
| ५. | नंदूरबार | ८ | ३ | ७ | ० | १ | ८ | १२ | १२ | ४३ |
| ६. | चंद्रपूर | २ | १ | १ | १ | १ | ० | ४ | ४ | १२ |
| ७. | गडचिरोली | ७ | ० | १५ | ० | ० | १ | १५ | ५ | ३६ |
| | **एकूण** | **२४** | **५** | **२३** | **१** | **३** | **९** | **३७** | **२३** | **१०१** |

विजपंप कार्यरत नसलेल्या २४ लाभार्थीकडे एकूण १०१ पशुधन असून त्यापैकी २८ गाई,४ म्हैशी, ९ शेळया व २३ कोंबडया असून सर्वात जास्त ३७ बैल आहेत.

**विजपंप मिळण्यास लागलेला कालावधी**

विजपंप कार्यरत असलेल्या ४०, वीजपंप मंजुरीनंतर प्रत्यक्ष पंप उपलब्ध झाल्याच्या कालावधीनुसारची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.१३**

| अ. क्र. | जिल्हा | कालावधी महिने | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तात्काळ | १ ते ३ | ३ ते ६ | ६ ते ९ | ९ ते १२ | एक वर्षापेक्षा जास्त | एकूण |
| १. | अमरावती | ३ | ६ | ० | ० | २ | ० | ११ |
| २. | यवतमाळ | २ | २ | ० | ० | ० | ० | ४ |
| ३. | नांदेड | १ | २ | ० | ० | ३ | ० | ६ |
| ४. | नाशिक | ० | १ | ७ | १ | ० | २ | ११ |
| ५. | नंदूरबार | ० | ० | १ | ० | १ | ० | २ |
| ६. | चंद्रपूर | १ | ० | १ | १ | ० | ० | ३ |
| ७. | गडचिरोली | ० | ० | ० | ० | २ | १ | ३ |
| | **एकूण** | **७** | **११** | **९** | **२** | **८** | **३** | **४०** |

एकूण ४० लाभार्थ्यांपैकी ७ (१८%) लाभार्थ्यांना तात्काळ, ११(२८%) लाभार्थ्यांना १ ते ३ महिन्यात, ९ (२२%) लाभार्थ्यांना ३ ते ६ महिन्यात, २ (५%) लाभार्थ्यांना ६ ते ९ महिन्यात, ८(२०%) लाभार्थ्यांना ९ ते १२ महिन्यात व बाकीच्या ३ (७%) लाभार्थ्यांना विजपंपासाठी अर्ज केल्यानंतर १ वर्षानंतर विजपंप मिळालेला आहे.

विजपंप कार्यरत नसलेल्या २४ लाभार्थ्यांची विजपंप मंजुरीनंतर प्रत्यक्ष पंप उपलब्ध झाल्याच्या कालावधीनुसार स्थिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५.१४**

| अ. क्र. | जिल्हा | कालावधी महिने | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तात्काळ | १ ते ३ | ३ ते ६ | ६ ते ९ | ९ ते १२ | एक वर्षापेक्षा जास्त | एकूण |
| १. | अमरावती | २ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| २. | यवतमाळ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ |
| ३. | नांदेड | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४. | नाशिक | १ | ० | ० | ० | १ | ० | २ |
| ५. | नंदूरबार | ८ | ० | ० | ० | ० | ० | ८ |
| ६. | चंद्रपूर | २ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ७. | गडचिरोली | ७ | ० | ० | ० | ० | ० | ७ |
| | एकूण | २२ | १ | ० | ० | १ | ० | २४ |

विजपंप कार्यरत नसलेल्या एकूण २४ लाभार्थीपैकी २२ (९२%) लाभार्थींना पंप तात्काळ मिळालेला आहे. प्रत्येकी एका लाभार्थ्यांस विजपंप १ ते ३ व ९ ते १२ महिन्यांचे आत प्राप्त झालेले आहेत. तथापि या लाभार्थींना अद्याप विज जोड मिळालेला नाही.

**विद्युतपंप वाटप करण्यात आलेल्या लाभधारकाचे वयोगटानुसार वर्गिकरण**

विजपंप कार्यरत असलेल्या ४० लाभार्थीचे वयोगटानुसार वर्गिकरण खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.५.१५

| अ.क्र. | जिल्हा | वयोगटानुसार वर्गिकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १८ ते २० | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ पेक्षा जास्त | एकूण |
| १. | अमरावती | ० | २ | ३ | २ | ४ | ११ |
| २. | यवतमाळ | ० | ० | २ | १ | १ | ४ |
| ३. | नांदेड | ० | १ | १ | १ | ३ | ६ |
| ४. | नाशिक | ० | २ | १ | २ | ६ | ११ |
| ५. | नंदूरबार | ० | ० | ० | २ | ० | २ |
| ६. | चंद्रपूर | ० | १ | १ | १ | ० | ३ |
| ७. | गडचिरोली | ० | ० | १ | १ | १ | ३ |
| | **एकूण** | **०** | **६** | **९** | **१०** | **१५** | **४०** |

विजपंप कार्यरत असलेलया एकूण ४० लाभार्थीपैकी, ६(१५%) लाभार्थी २१ ते ३० वयोगटातील आहेत. ९(२२%) लाभार्थी ३१ ते ४० वयोगटातील आहेत. ४१ ते ५० वयोगटातील १०(२५%) लाभार्थी आहेत. सर्वात जास्त लाभार्थी १५(३८%) ५१ पेक्षा जास्त वय वर्षे असणारे आहेत.

**विजपंप कार्यरत नसलेल्या २४ लाभार्थींचे वयोगटानुसार वर्गिकरण खालीलप्रमाणे आहे.**

तक्ता क्र.५.१६

| अ.क्र. | जिल्हा | वयोगटानुसार वर्गिकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १८ ते २० | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ पेक्षा जास्त | एकूण |
| १. | अमरावती | ० | ० | २ | ० | ० | २ |
| २. | यवतमाळ | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ३. | नांदेड | ० | ० | ० | १ | ० | १ |
| ४. | नाशिक | ० | ० | ० | १ | १ | २ |
| ५. | नंदूरबार | ० | ० | १ | ५ | २ | ८ |
| ६. | चंद्रपूर | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ७. | गडचिरोली | ० | ० | १ | २ | ५ | ८ |
| | **एकूण** | **०** | **१** | **४** | **९** | **१०** | **२४** |

विजपंप कार्यरत नसलेल्या २४ लाभार्थ्यांपैकी १(४%) लाभार्थी २१ ते ३० वयोगटातील, ४(१७%) ३१ ते ४० वयोगटातील ९ (३८%) लाभार्थी ४१ ते ५० वयोगटातील, सर्वात जास्त १०(४१%) लाभार्थी ५१ पेक्षा जास्त वयोगटातील आहेत.

**शैक्षणिक वर्गीकरण**

**विजपंप कार्यरत असलेल्या ४० लाभार्थ्यांचे शिक्षणानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.**

**तक्ता क्र.५.१७**

| अ.क्र. | शिक्षण | लाभार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | लिहिता व वाचता न येणारे | २२ | ५५% |
| २. | इयत्ता १ ते ४ पर्यंत | ६ | १५% |
| ३. | इयत्ता ५ ते ७ पर्यंत | ६ | १५% |
| ४. | इयत्ता ८ ते १० पर्यंत | ४ | १०% |
| ५. | इयत्ता ११ ते १२ पर्यंत | १ | २.५% |
| ६. | पदवीधर | १ | २.५% |
| | **एकूण** | **४०** | **१००%** |

एकूण ४० लाभार्थीपैकी २२(५५%) लिहिता व वाचता न येणारे आहेत. इयत्ता १ ते ४ थी पर्यंत ६ (१५%), ५ वी ते ७ वी पर्यंत ६(१५%), ८ वी ते १० वी पर्यंत ४ (१०%), इ.११ वी ते १२ वी पर्यंत १ (२.५%), पदवीपर्यंत १(२.५%) शिक्षण घेतलेले लाभार्थी आहेत.

**विजपंप कार्यरत नसलेल्या २४ लाभार्थ्यांची शिक्षणानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.**

**तक्ता क्र.५.१८**

| अ.क्र. | शिक्षण | लाभार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | लिहिता व वाचना न येणारे | १३ | ५४% |
| २. | इ.१ ली ते ४ थी पर्यंत | ८ | ३३% |
| ३. | इ.५ वी ते ७ वी पर्यंत | ० | ० |
| ४. | इ.८ वी ते १० वी पर्यंत | २ | ९% |
| ५. | इ.११ वी ते १२ वी पर्यंत | १ | ४% |
| | **एकूण** | **२४** | **१००%** |

विजपंप कार्यरत नसलेल्या २४ लाभार्थ्यांपैकी लिहिता व वाचता न येणारे १३ (५४%), इ.१ली ते ४ थी पर्यंत शिक्षण घेतलेले ८(३३%), इ.८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेतलेले २(९%), इ.११वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले १(४%) लाभार्थी आहेत.

**तक्ता क्र.५.१९**

**वीजपंप मिळालेल्या लाभार्थींचे वय व शिक्षणाबाबत वर्गीकरण**

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | वय (वर्षे) | शिक्षण | लिंग | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्रिया |
| १ | अमरावती | २२ | १० वी | ✓ | - |
| २ | अमरावती | ७० | निरक्षर | ✓ | - |
| ३ | अमरावती | २७ | निरक्षर | - | ✓ |
| ४ | अमरावती | ७० | निरक्षर | ✓ | - |
| ५ | अमरावती | ३२ | ७ वी | ✓ | - |
| ६ | अमरावती | ४८ | निरक्षर | ✓ | - |
| ७ | अमरावती | ५० | निरक्षर | ✓ | - |
| ८ | अमरावती | ६० | निरक्षर | ✓ | - |
